# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर संकलन विभाग

दि.२५/०५/२०२२

## प्रेस नोट

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दित आजतागयत ९०७१७७ इतक्या मालमत्ता असून सद्यस्थितीत मालमत्ता कर देयक वाटप सुरु आहे. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात मालमत्ता कराची ३२१ कोटी वसुली करण्यात आलेली आहे चालु वित्तीय वर्षात मालमत्ता कराची वसुली १००% करण्याच्या उद्देशाने मालमत्ता धारकांना प्रोत्साहनपर विविध योजनोचा लाभ महानगरपालिके मार्फत देण्यात येत आहे. सदर योजना खालीलप्रमाणे

१. **मुदतीत कर भरणा करणाऱ्या मालमत्ता कर धारकांना प्रोत्साहनपर मालमत्ता करात (सामान्य करात) सूटः**

- योजना

| सूटचा तपशील | |
|---|---|
| **कालावधी** | **सूटचा दर** |
| ३० जून पर्यत<br>१ जुलै ३१ जुलै पर्यंत | ५% (सामान्य करावर)<br>३% (सामान्य करावर) |

- सदर योजनेस मालमत्ता धारकांकडून मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसादः

| मुदतीत मालमत्ता कर भरणे (दि.२४/०५/२०२२) | | |
|---|---|---|
| मालमत्तांची संख्या | वसुली | मालमत्ता करात देण्यात आलेली सूटची रक्कम |
| ४२६२८ | १४७७०३१६५ | ३१७२३८१ |

२. **महानगरपालिका हद्दित थकीत मालमत्ता कर धारकांसाठी अभय योजना**

"अभय योजना २०२२-२३" अंतर्गत ६०० चौ. फुट पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या ज्या अधिकृत निवासी मालमत्ता धारकांचा दि.२४/०४/२०२२ रोजी पर्यंत थकीत मालमत्ता कर असेल अशा सर्व करदात्यांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

- योजना

| कालावधी | जमा करायाच्या रक्कमेचा तपशील | नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारा दंड (शास्ती/व्याज) माफीचा तपशील |
|---|---|---|
| २५ एप्रिल २०२२ ते ३१ जुलै २०२२ | थकीत मालमत्ता कराची रक्कम +५०% दंड नियम क्र.४१ अन्वये रक्कमेचा एक रक्कमी भरणा केल्यास | ५०% |

- **सदर योजनेअंतर्गत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या मालमत्ता धारकांचा तपशील खालीलप्रमाणे:**

| | मालमत्तांची संख्या | कर भरणा करण्यात आलेली रक्कम | दंडात्मक रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|
| अभय योजना | ३५१ | २०७१५७६ | ३५८१२३ | २४२९६९९ |

सदर योजनेचा प्रसार जास्तीत जास्त मालमत्ता धारकांपर्यंत व्हावा या करिता महानगरपालिका हद्दित विविध माध्यमाव्दारे जाहिरात प्रसिध्दी सुरु करण्यात आलेली आहे. मालमत्ता कर देयक वाटपाचे काम प्रगतीपथावर सुरु असुन आजतागयत ७०% मालमत्ता कर देयकांचे वाटप करण्यात आलेले आहे. ज्या मालमत्ता धारकांना मालमत्ता कर देयके प्राप्त झाली नसतील अशा मालमत्ता धारकांच्या सोयीसाठी महानगरपालिके मार्फत ऑनलाईल पद्धतीने आपले मालमत्ता कर देयक पाहण्याची सुविधा महानगरपालिकेच्या सांकेतीक स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरणा करण्याची सुविधा मनपाच्या www.vvcmc.in सांकेतिक स्थळावर इंटरनेट बॅकींग, डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड, यु.पी.आय (Google Pay, Phone Pe, Paytm, Bhim App. Etc.) सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रोख पध्दतीने कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांसाठी प्रभाग समिती स्तरावर विविध ठिकाणी कर भरणा केंद्र सुरु आहेत. मालमत्ता धारकांच्या सोयीससाठी योजना लागू असेपर्यंत सोमवार ते शनिवार सकाळी १०:०० ते सायं ०५:०० वाजेपर्यत कर भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत.

सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, उक्त योजनांचा जास्तीजास्त मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा व आपला मालमत्ता कर वेळेत भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**